प्रेसनोट

दि.१४/०६/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | अहमदनगर/नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३०१०/२०१४ |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | विनोद श्रीकृष्ण वानखेडे, वरिष्ठ लिपीक, वर्ग ३, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १०००/- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, आरोपी लोकसेवक विनोद श्रीकृष्ण वानखेडे, वरिष्ठ लिपीक, वर्ग ३, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांनी तक्रारदार यांचे सेवा कालावधीतील ३०० दिवस हक्क रजेचे रोखीकरण बील मंजूरीसाठी बिलावर ना हरकत शेरा देण्यासाठी तक्रारदार यांना १०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. त्यावरुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर येथील कार्यालयात तक्रार दिलेवरुन दिनांक २६/८/२०१४ रोजी सापळा आयोजीत केला असता आरोपी लोकसेवक विनोद श्रीकृष्ण वानखेडे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचांसमक्ष १०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम रुपये १०००/- पंचांसमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले होते. त्यांच्याविरुध्द तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर येथे दि.२६/८/२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदर गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, अहमदनगर येथे नमुद आरोपीविरुध्द दि.२३/१२/२०१४ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br>सदर खटल्याची मा.श्री.व्ही.व्ही.बांबर्डे, जिल्हा न्यायाधीश-२, अहमदनगर यांचे समोर सुनावणी होऊन आरोपी लोकसेवक विनोद श्रीकृष्ण वानखेडे यांना आज दि. १४/६/२०१९ रोजी १)ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ३ वर्ष साधे कारावासाची व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवसांची साधे कारावासाची शिक्षा २)ला.प्र.का. सन १९८८ चे कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे ५ वर्ष साधे कारावासाची व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवसांची साधे कारावासाची शिक्षा सुनावली आहे.<br>सदर गुन्हयाचा तपास ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर येथील तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.चंद्रशेखर सावंत यांनी केला असून सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे ॲड.श्री. ए.एम.घोडके, सहायक सरकारी अभियोक्ता, अहमदनगर यांनी काम पाहिले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर

Scanned by CamScanner